26-01-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 01/25/2025 11:54 PM Page 1



# भारताचा विजयी 'तिलक'

## अर्धशतकाच्या जोरावर थरारक लढतीत इंग्लंडवर २ गड्यांनी मात : मालिकेत २-० ने घेतली आघाडी

**चेन्नई, दि. २५ :**

तिलक वर्माच्या (७२*) शानदार अर्धशतकीय खेळीच्या जोरावर हातातून निसटलेल्या सामन्यात पुनरागमन करीत इंग्लंडवर दुसऱ्या टी- ट्वेंटी सामन्यात दोन गड्यांनी विजय मिळविला. चेन्नईच्या चेपॉक मैदानावर मिळविलेल्या या विजयाबरोबरच २-० अशी आघाडी टीम इंडियाने घेतली आहे. इंग्लंडने प्रथम फलंदाजी करताना भारतासमोर १६६ धावांचे लक्ष्य ठेवले होते. भारतीय संघाने हे टार्गेट १९.२ षटकात ८ गड्यांच्या मोबदल्यात गाठले.

इंग्लंडकडून मिळालेल्या १६६ धावांचा लक्ष्याचा पाठलाग करताना भारताची सुरुवात चांगली झाली नाही. दुसऱ्याच षटकात पहिल्या सामन्यात आक्रमक खेळी करणारा अभिषेक शर्मा पायचित बाद झाला. अभिषेकने ३ चौकारानिशी १२ धावा केल्या. त्यानंतर सलामीवीर संजू सॅमसननेही निराश केले. चोप्रा आर्चरने संजूला बाद केले. संजूने केवळ ५ धावांचे योगदान दिले. संजू माघारी परतल्यानंतर फलंदाजीस आलेल्या कर्णधार सूर्यकुमार यादवने तिलक वर्माच्या सहाय्याने डाव सावरण्याचा प्रयत्न केला. दोघांनीही जोरदार फटकेबाजी केली. पण ही जोडी जास्त काळ मैदानात टिकू शकली नाही. सूर्यकुमार क्लिन बोल्ड झाला. सूर्यकुमारने ३ चौकारांनिशी फक्त १२ धावा केल्या. सूर्यकुमार पॅव्हेलियनमध्ये परतल्यानंतर फलंदाजीस आलेल्या जुरेलही चांगली खेळी करता आली नाही आणि तो सुद्धा केवळ चार धावा काढून तंबूत परतला. त्यामुळे भारताची स्थिती ४ बाद ६६ अशी झाली. त्यानंतर फलंदाजीस आलेल्या हार्दिक पांड्याने तिलक वर्माला थोडी फार साथ दिली. पण ही जोडी जास्त काळ मैदानात टिकली नाही. हार्दिक पांड्या केवळ ७ धावा काढून बाद झाला. हार्दिक तंबूत परतल्यानंतर मैदानात फलंदाजीस आलेल्या वॉशिंग्टन सुंदरने आक्रमक फलंदाजी करीत विजयाच्या आशा पल्लवित केल्या. तिलक वर्माला चांगली साथ दिली. पण संघाला ५० धावांची गरज असताना मोक्याच्या क्षणी वॉशिंग्टन सुंदर त्रिफळाचित झाला. वॉशिंग्टनने ३ चौकार आणि एका षटकारानिशी २६ धावांचे महत्वपूर्ण योगदान दिले. नंतर फलंदाजीस आलेल्या अक्षर पटेलनेही निराश केले. अक्षर




केवळ २ धावा करून माघारी परतला. मात्र, दुसऱ्या बाजूने तिलक वर्माने फटकेबाजी सुरूच ठेवली व आपले अर्धशतक पूर्ण केले व विजयी चौकार मारत विजयावर शिक्कामोर्तब केले.

तिलक वर्माने ४ चौकार आणि ५ खणखणीत षटकारांनिशी नाबाद ७२ धावांची खेळी करीत विजयश्री खेचून आणला. रवी बिश्नोईने त्याला चांगली साथ दिली. बिश्नोईने ९ धावांची खेळी केली. इंग्लंडतर्फे कार्सने सर्वाधिक ३ गडी बाद केले. आर्चर, लिव्हिंगस्टन, वूड, रशिद यांनी प्रत्येकी एक- एक गडी बाद केले.

तत्पूर्वी, भारतीय संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. कर्णधार सूर्यकुमारचा निर्णय सार्थकी ठरवत अर्थदीपने पहिल्याच षटकात फिल सॉल्टने पॅव्हेलियनचा रस्ता दाखविला. सॉल्टने केवळ ४ धावा केल्या. त्यानंतर फलंदाजीस आलेल्या बेन डकेटलाही जास्त काळ मैदानात टिकू दिले नाही. चौथ्या षटकाच्या पहिल्याच चेंडूवर वॉशिंग्टन सुंदरने डकेटला घरचा रस्ता दाखविला. डकेटने केवळ ३ धावा काढल्या. मात्र, दुसऱ्या बाजूने कर्णधार जोस बटलरने फटकेबाजी सुरूच ठेवली. त्याला डकेटची जागा घेण्यासाठी आलेल्या हॅरी ब्रुकने चांगली साथ दिली. यादरम्यान दोघांनी संघाच्या धावसंख्येचे अर्धशतक फलकावर लावले. ही जोडी मोठ्या धावसंख्येच्या दिशेने संघाला घेऊन जाणार असे वाटत असतानाच वरूण चक्रवर्तीने हॅरी ब्रुकला बाद करीत इंग्लडला मोठा धक्का दिला. हॅरीने १३ धावा केल्या. तद्नंतर अर्धशतकाच्या दिशेने वाटचाल करीत असलेल्या जोस बटलरला अक्षर पटेलने बाद करीत इंग्लंडला चौथा धक्का दिला. बटलर अर्धशतक करण्याच्या जवळ होता, पण तो तसे करू शकला नाही आणि सीमारेषेवर झेलबाद झाला. बटलरने ३० चेंडूत दोन चौकार आणि तीन षटकारांच्या मदतीने ४५ धावा केल्या. त्यानंतर अक्षर पटेलने लिव्हिंगस्टनला पॅव्हेलियनचा रस्ता दाखवला. १३ धावा करून तो बाद झाला. त्यामुळे इंग्लंडची अवस्था ५ बाद ९० धावा अशी झाली. फिरकीपटू अभिषेक शर्माने इंग्लंडला सहावा धक्का दिला. त्याने जेमी स्मिथला बाद केले आहे. जेमी स्मिथने एक चौकार आणि २ षटकारांनिशी २२ धावा केल्या. त्यापाठोपाठ वरुण चक्रवर्तीने ओव्हरटनला पॅव्हेलियनचा रस्ता दाखवला. ओव्हरटन ५ धावा करून बाद झाला. त्यानंतर चोप्रा आर्चर १२ आणि आदिल रशिदने १० धावा केल्यामुळे इंग्लंडला निर्धारित २० षटकात १६५ धावांपर्यंत मजल मारता आली. भारततर्फे अक्षर पटेल, वरूण चक्रवर्तीने प्रत्येकी दोन- दोन गडी बाद केले. अर्शदीप, हार्दिक, वॉशिंग्टन आणि अभिषेकने प्रत्येकी एक- एक गडी टीपला.

## निवडक

### खोर्ली-म्हापसा येथील राष्ट्रोळी देवस्थानचा आजपासून जत्रोत्सव

■ टीम दैनिक हेराल्ड



**म्हापसा, दि. २५ :** श्री देव राष्ट्रोळी देवस्थान सिम खोर्ली म्हापसाचा ५८ वा जत्रोत्सव आज रविवार २६ ते २८ जानेवारी खालील कार्यक्रमानुसार साजरा होणार आहे.

रविवार २६ रोजी सकाळी धार्मिक विधी दहा वाजता सत्यनारायण महापूजा यजमान सौ. व श्री. सुशांत साळगावकर, नीलिमा साळगावकर दुपारी १.३० वाजता महाप्रसाद संध्याकाळी ६.३० वाजता मराठी संगीताचा कार्यक्रम भाव धारा रात्री १०.३० वाजता नाटक 'कामा पुरतो मामा'. दि. २७ रोजी सत्यनारायण महापूजा संध्याकाळी फॅन्सी ड्रेस स्पर्धा वय एक ते सहा, संपर्क ९९२३०२२०८० रात्री १० वाजता केतन साळगावकर म्हापसा प्रस्तुत ऑर्केस्ट्रा गोवन पॅरेडाइज .

दि. २८ रोजी सकाळी सत्यनारायण महापूजा पूजेचे मानकरी आनंद व सौ. अनुषा फळारी रात्री १० वाजता पावणी रात्री ११ वाजता नाटक 'तू आणि हाव' सादर होणार आहे.

---




**हळर्ण : पंचक्रोशी हायस्कूलमध्ये विजेत्या विद्यार्थ्यांसमवेत मुख्याध्यापक सर्वेश परब व क्रीडा प्रशिक्षिका मनीषा परब.**

### हळर्ण पंचक्रोशी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची क्रीडा स्पर्धेत चमकदार कामगिरी

■ टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. २५ :** क्रीडा संचालनालयातर्फे पेडे क्रीडा संकुलाच्या मैदानावर आयोजित केलेल्या दोन दिवसीय २०२४-२५ पेडणे तालुका स्तरीय क्रीडा स्पर्धेत हळर्ण पंचक्रोशी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी चमकदार यश मिळवले आहे. या स्पर्धेत शाळेतून एकूण ३३ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. सदर स्पर्धेत १७ वर्षाखालील मुलांच्या गटातून कु.प्रवीण नागेश कोरगावकर हॅमर थ्रो मध्ये प्रथम, श्रेयश समीर गवस याने १५००मी.धावणे व ११०मी. हर्डलमध्ये दुसरा क्रमांक तर साईराज सुनील कदम याने ३ कि. मी. धावण्याच्या शर्यतीत तिसरा क्रमांक मिळवला. त्याच प्रमाणे मुलींच्या गटात ३ कि. मी. चालण्याच्या शर्यतीत सर्वांगी राघोजी नाईक हिने व समीक्षा जयप्रसाद जाधव हिने दुसरा क्रमांक मिळवला,भक्ती आनंद परब हिने १५०० की.मी धावणे दुसरा क्रमांक पटकावला व अनोखी अजित परब हिने १००मी.हर्डल शर्यतीत दुसरा क्रमांक तर कमल फोंडू सावंत हिने ८०० मी धावण्याच्या शर्यतीत तिसरा क्रमांक मिळवला.

विद्यार्थ्यांना शाळेच्या क्रीडा प्रशिक्षिका मनीषा फटी परब यांनी मोलाचे प्रशिक्षण मार्गदर्शन व सहकार्य लाभले विद्यार्थ्यांनी आपले कौशल्य व कुशलता पणास लावून स्पर्धेत यश मिळवल्याबद्दल शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा प्रिया पुरुषोत्तम परब व्यवस्थापक फटी पु.परब व मुख्याध्यापक सर्वेश परब तसेच पालक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विजेत्या खेळाडू विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

---



**सडा : श्री लक्ष्मीनारायण मूर्ती प्रतिष्ठापने समयी पुरस्कर्ते श्री. व सौ. सोनिया आशिष फटजी, प्रेमानंद केरकर, सुवर्ण परब, पुरोहित महेश भट व इतर.**

### सडा येथील लक्ष्मीनारायण मूर्ती प्रतिष्ठापना उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड

वास्को, दि. २५ : हेडलॅण्ड सडा मुरगांव येथील श्री लक्ष्मी नारायण देवालयाच्या नूतन उत्सव मुर्तीची शनिवारी भाविकांच्या उपस्थितीत विधीवत चल प्रतिष्ठापना करण्यात आली. देवालयाच्या रौप्य महोत्सवी पुन: प्रतिष्ठापनेचा वर्धापनदिन व ५१ व्या पालखी उत्सवा निमीत्त या नवीन उत्सव मूर्तीची चल प्रतिष्ठापना करण्याचा योग जुळून आला. पुर्वीची उत्सव मूर्ती जीर्ण झाल्याने प्रेमानंद केरकर यांच्या अध्यक्षतेखालील देवालय कमिटीने पुढाकार घेऊन ही प्रतिष्ठापना करण्याचा मान मिळविला. पुरोहित महेश भट यांच्या पौरोहित्याखाली यजमान श्री. व सौ. सोनिया आशिष फटजी यांच्याहस्ते नवीन उत्सव मूर्तीची चल प्रतिष्ठापना बिंब शुध्दी, इतर विधीसह व मंत्रोच्चाराने करण्यात आली. आरती होऊन या सोहळ्याची सांगता झाली.

# पेनकैक सिलाट चॅम्पियनशिपमध्ये गोवा संघाची नेत्रदीपक कामगिरी

टीम दैनिक हेराल्ड

डिचोली, दि. २५ : मंदसौर (मध्यप्रदेश) येथे झालेल्या ६व्या पश्चिम विभागीय पेनकैक सिलाट चॅम्पियनशिप २०२५ मध्ये गोवा संघाने तिसरे स्थान मिळवून प्रभावी कामगिरी केली. ज्यामध्ये त्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत ८ सुवर्ण पदके, ८ रौप्य पदके आणि १ कांस्य पदक मिळवले आहे.

सुवर्णपदक विजेते

आरव सावंत - तांडिंग माकन (२० किलोखालील पुरुष), श्रीधा भाजे - तांडिंग माकन - वर्ग ब (२३ किलो ते २४ किलो महिला), अनिरुद्र गावस - तांडिंग माकन-वर्ग ब (३१ किलो ते ३२ किलो पुरुष), आद्याशा प्रियदर्शिनी सामल - तांडिंग पूर्व-किशोर-वर्ग (३१ किलो ते ३२ किलो महिला), समर्थ शिरोडकर - तांडिंग पूर्व-किशोर-वर्ग (७३ किलो ते ७५ किलो पुरुष), अजय दीपक कार्बोटकर - तांडिंग वरिष्ठ-वर्ग (५१ किलो ते ५५ किलो पुरुष), आशा बाबू नाईक - तांडिंग वरिष्ठ-वर्ग (६६ किलो ते ७० किलो महिला), जादेन रोनन वाज - तांडिंग ज्युनियर-वर्ग (५६ किलो ते ६० किलो पुरुष.



**मध्यप्रदेश येथे झालेल्या ६ व्या पश्चिम विभागीय पेनकैक सिलाट चॅम्पियनशिप २०२५ मध्ये उत्कृष्ट कामगिरी बजावलेला गोवा संघ.**

रौप्य पदक विजेते - बेव्हरली दा सिल्वा - टँडिंग प्री-टीन-क्लास (३३ किलो ते ३४ किलो महिला), क्रिसी फर्नांडिस - टँडिंग प्री-ज्युनियर-क्लास (३७ किलो ते ३९ किलो महिला). कलात्मक स्वरूपात तुगल प्री-ज्युनियर-क्लास (महिला) मध्ये रौप्यपदक देखील जिंकले. जॅरेड एडेन पिंटो - टँडिंग प्री-ज्युनियर-क्लास (४५ किलो ते ४८ किलो पुरुष), कलात्मक स्वरूपात तुगल प्री-ज्युनियर-क्लास (पुरुष) मध्ये रौप्यपदक देखील जिंकले, अले सॅम दा सिल्वा - कलात्मक स्वरूपात वरिष्ठ वर्ग (पुरुष), मिलाग्रिना कोलाको - टँडिंग सीनियर-क्लास (७१ किलो ते ७५ किलो महिला), जोश रिस वाझ - टँडिंग प्री-टीन-क्लास (३१ किलो ते ३२ किलो पुरुष).

कांस्य पदक विजेता - अले सॅम दा सिल्वा - टँडिंग सीनियर-क्लास (७१ किलो ७५ किलो पर्यंत पुरुष) प्रशिक्षक अजय दीपक कार्बोटकर यांनी या सर्व स्पर्धकांना प्रशिक्षण व मार्गदर्शन केले. त्यांना सहाव्या पश्चिम विभाग पेनकाक सिलाट चॅम्पियनशिप २०२५ चा सर्वोत्कृष्ट फायटर म्हणून सन्मानित करण्यात आले, ज्याने त्याच्या अपवादात्मक कौशल्याने आणि दृढनिश्चयाने गोव्याला अभिमान प्राप्त करून दिला.



**पर्वरी : बक्षिसे देताना अमिता नायक सलत्री. बाजूला डॉ. निता राणे, कीर्ती सावईकर, रीना प्रभुदेसाई व आनंद गावकर.**

# भारतीय संस्कृती सर्वश्रेष्ठ

## अमिता नायक सलत्री : पर्वरीत 'कलांकूर' शिर्षकाखाली बक्षीस समारंभ सोहळा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २५ :** पर्वरी येथील प्रबोधन एज्यूकेशन सोसायटीच्या एल. डी. सामंत माध्यमिक विद्यालयाचा 'कलांकूर' हे शिर्षकाखालील बक्षीस समारंभ सोहळा अलीकडेच आयोजित करण्यात आला. एकूण ५४ स्पर्धांमधील सुमारे तिनशे विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्या म्हणून रुचीक फेम आणि अभिनेत्री अमिता नायक सलत्री यांच्या हस्ते यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

यावेळी व्यासपीठावर पालक - शिक्षक संघाचे अध्यक्ष आनंद गावकर, मुख्याध्यापिका डॉ. नीता राणे, तसेच कीर्ती सावरकर आणि रीना प्रभुदेसाई या शिक्षिका उपस्थित होत्या.

प्रारंभी डॉ. नीना राणे यांनी स्वागतपर भाषण करून प्रमुख पाहुण्या अमिता नायक सलत्री यांचा परिचय करून दिला. अमिता सलत्री यांनी यावेळी केलेल्या मार्गदर्शपर भाषणात उपस्थित विद्यार्थ्यांना मौलीक, असे मार्गदर्शन केले.

चंगळवाद - भोगवाद, अश्लिलता - बिभत्सता, व्याभिचार - हिंसाचार या पाश्चात्य विकृतीला बळी न पडता माणसाला घडविणाऱ्या सर्वश्रेष्ठ अशा भारतीय संस्कृतीचे कायम आचरण करा. बल विद्याच ना नारा, या आपल्या भारतीय संस्कृती मंत्राचे पालन केल्यास आपण सारे उच्च विद्याविभूषित नक्कीच व्हाल, असे ही त्यांनी प्रतिपादन केले.

पालक-शिक्षक संघाचे अध्यक्ष आनंद गावकर यांनीही यावेळी मार्गदर्शन केले. या कलांकूर बक्षी, समारंभाच्या प्रमुख कीर्ती सावईकर यांनी आभार प्रदर्शन केले. शिक्षिका अक्षदा गोवेकर यांनी सूत्रसंचालन केले. शांतीमंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली.

# प्रायोरिटी टायटन्स, काणकोण मठग्राम युनायटेड जैतिवंत

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २५ :** गोंय जीएसबी स्पोर्ट्स अँड चॅरिटेबल ट्रस्टान गोंय सारस्वत समाजाच्या जोड पालवान आयोजीत केल्ले आल्कॉन जीएसबी युनिटी कप टी-२० क्रिकेट सर्तीत प्रायोरिटी टायटन्सान सिंक रेंजर्स यूसीक ११० धांवड्यांनी आनी काणकोण मठग्राम युनायटेडान म्हापसा ड्रीम क्रशर्स यूसीक ५ विकेटी आनी ८ बॉलांनी हारयलो.




**विक्रांत प्रभू व स्मितेश दिवेकर यांना अनुक्रमे सामनावीर व हिरो ऑफ द मॅच पुरस्कार प्रदान करताना निवेदित वायगणकर व विक्रम गायतोंडे**

मडगांवच्या एमसीसी मैदानाचेर जाल्ले सकाळच्या सत्र मॅचींत प्रायोरिटी टायटन्सान २० ओव्हरींनी ८ विकेटी वगडावन १९९ धांवड्यो केल्यो. ते उपरांत तांणी सिंक रेंजर्साक १५.१ ओव्हरींनी ८९ धांवड्यांचेर आवट केलें. सिंकान टॉस जिखून पयलीं बॉलींग करपाचो निर्णय घेतले उपरांत प्रायोरिटी वतीन सिद्धेश आमोणकारान सगल्यांत चड ३५ धांवड्यो केल्यो. ऑलराऊंडर सिद्धार्थ घाणेकारान २० बॉलांनी नाबाद ३२ आनी विक्रांत प्रभून ९ बॉलांत ३ सके आनी एका चौक्यान २६ धांवड्यो केल्यो. रेंजर्सा वतीन तुनिश सावकारान सगल्यांत चड ३ विकेटी घेतल्यो. ताका जाप दितना सिंक रेंजर्साचो यूसी १५.१ ओव्हरींनी फक्त ८९ धांवड्यांचेर सोंपलो. सिंक रेंजर्सा वतीन समृद्धी भरणेन सगल्यांत चड ३५ धांवड्यो केल्यो. विक्रांत प्रभून लेगीत बॉलिंगांत चमक दाखोवन १३ धांवड्यो दिवन ३ विकेटी घेतल्यो. ताका मॅन ऑफ द मॅच पुरस्कार फावो जालो. स्मितेश दिवेकारान ४ धांवड्यो दिवन ३ विकेटी घेतल्यो.

दनपारच्या सत्रांत पयलीं बॅटींग करतना म्हापसा ड्रीम क्रशर्सान १९.५ ओव्हरींनी १३% धांवड्यो केल्यो. साईश हेगडे (३%) आनी सर्वेश कामत (३५) हांचे मदीं ७९ धांवड्यांची भरीव ओपनिंग भागिदारी करून लेगीत ड्रीम क्रशर्स १५० धांवड्यांचो आंकडो हुपपाक शकलो ना. काणकोण वतीन कृष्णकांत हेगडे देसायान फक्त १० धांवड्यो दिवन ४ विकेटी घेवन म्हापशेंच्या स्कोराचेर नियंत्रण दवरलें. मोखीचो फाटलाव करतना विराज पुराणीक (३२) आनी साहिल मांद्रेकार (३४) हांणी काणकोण मठग्राम युनायटेडाक फक्त ४.५ ओव्हरींनी ५० धांवड्यांची सुरवात करून दिली. ते उपरांत साहिलान सुमिरन आमोणकार (२०) वांगडा दुसरे विकेटी खातीर ४५ धांवड्यांची भागिदारी केली. कांय धपके उपरांत तांची स्थिती ५ बाद ११७ अशी जाली. पूण, रामनाथ प्रभू बाम (९ बॉलांनी नाबाद २०) आनी अमेय राजाध्यक्षान (नाबाद ९) आनीक पडपाक दिलें ना आनी काणकोण मठग्रामाक १८.४ ओव्हरींनी मोखी मेरेन व्हेलो. कृष्णकांत हेगडे देसाय हे मॅचीचे जैतिवंत थारले.

**थोडेभितर धांवतकटो**

प्रायोरिटी टायटन्सः २० ओव्हरींनी ८ बाद १९९ (सिद्धेश आमोणकार ३५, सिद्धार्थ घाणेकार नाबाद ३२, अनीश महांबरो २९, विक्रांत प्रभू २६, वेद महांबरो २१, तुनीश सावकार ३८-३, सनत म्हापणे ३९-१, अनीश काकोडे १७-१, आशय आंबे २४-१, वामन नाडकर्णी १५-१). सिंक रेंजर्स यूसीः १५.१ ओव्हरींनी ८९ (समृद्ध भरणे ३५, साहिल अडवलपालकार १४, सनत म्हापणे ११, स्मितेश दिवेकार ४-३, विक्रांत प्रभू १३-३, वेंकट बिचे १०-१, कपिल सिनाय बोरकार १०-१, गौरीश प्रभुदेसाय १३-१)

म्हापसा ड्रीम क्रशर्स : १९.५ ओव्हरींनी १३७ (साईश हेगडे ३७, सर्वेश कामत ३५, संजय नेत्रावळकार २३, कृष्णकांत हेगडे देसाय १०-४, रामनाथ प्रभू बाम १३-२, प्रणव कामत २१-१, विराज पुराणीक १४-१) हारले वि. काणकोण मठग्राम युनायटेड : १८.४ ओव्हरींनी ५ बाद १४३ (साहिल मांद्रेकार ३४, विराज पुराणीक ३२, सुमिरन आमोणकार २०, रामनाथ प्रभू बाम नाबाद २०, व्यंकटेश वेर्लेकार १७-३, विपुल देशप्रभू ३५-१)

# डॉ. सलील कुलकर्णी यांचा 'बाकीबाब आणि मी' आज कार्यक्रम

**बा.भ. बोरकर यांच्या स्वरबद्ध कवितांचे होणार सादरीकरण : साखळी रवींद्र भवनतर्फे आयोजन**

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. २५ :** साखळी रवींद्र भवनतर्फे रविवार दि. २६ रोजी रवींद्र भवनच्या पं. मनोहरबुवा शिरगावकर नाट्यगृहात प्रसिद्ध संगीतकार गायक डॉ. सलीम कुलकर्णी यांचा बाकीबाब आणि मी हा संगीताचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. संध्याकाळी ६.३० वाजता होणाऱ्या या कार्यक्रमात गोव्याचे प्रसिद्ध कवी बा. भ. बोरकर यांच्या स्वरबद्ध केलेल्या कवितांचे गीतस्वरूपात सादरीकरण करण्यात येणार आहे. अशी माहिती रवींद्र भवनचे उपाध्यक्ष दत्ताराम चिमुलकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.



साखळी रवींद्र भवनचे नवीन संचालक मंडळ स्थापन झाल्यानंतर या रवींद्र भवनातून लोकांना विविध कार्यक्रमांची मेजवानी मिळत आहे. आतापर्यंत अनेक दर्जेदार कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. त्याचबरोबर युवा व बालकलाकारांच्या कलेला उभारी देण्यासाठी विविध विषयांवर कार्यशाळाही आयोजित करण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे गोव्याच्या इतर भागात व बाहेरही होणारे दर्जेदार कार्यक्रम साखळी व परिसरातील लोकांना अनुभवायला मिळावे यासाठी रवींद्र भवन सदैव प्रयत्नरत आहे.

रविवारी होणाऱ्या या अनोख्या अशा कार्यक्रमात कवी बा. भ. बोरकर यांनी रचलेल्या ३५ निवडक अशा डॉ. सलील कुलकर्णी यांनी स्वरबद्ध केलेल्या कवितांचे सादरीकरण ते स्वतः करणार आहेत. त्यांना आदित्य आठल्ये, रितेश ओहोळ व डॉ. राजेंद्र दुरकर हे साथसंगत करतील तर निवेदन आसावरी देशपांडे करणार आहेत. हा कार्यक्रम गोव्याबरोबरच महाराष्ट्रातही बराच प्रसिद्ध आहे. यास लोकांनी उपस्थिती लावावी, असे आवाहन उपाध्यक्ष दत्ताराम चिमुलकर यांनी केले आहे.

या पत्रकार परिषदेला संचालक श्रीरंग सावळ, दिनकर घाडी, स्नेहा देसाई, रविराज च्यारी तसेच कार्यक्रम प्रमुख लक्षराज आमोणकर, सांस्कृतिक विभागाचे श्रनेश हिंदे, जेस लुईस यांची उपस्थिती होती.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक १४४ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 144 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .